


दैनिक
# कोकण किनारा
सर्वसामान्यांचा बुलंद आवाज...
रत्नागिरी व सिंधुदुर्ग स्वतंत्र आवृत्त्या

PRGI NO. MHMAR/26/A1026 | रत्नागिरी | वर्ष १ ले | अंक १९५ | सोमवार दि. २१ सप्टेंबर २०२६ | पृष्ठे ८ | किंमत : ₹ ५

## वाटद डिफेन्स क्लस्टरचा विरोध संपुष्टात येणार?

### एमआयडीसी विरोधी संघर्ष समिती, ग्रामस्थांसोबत सकारात्मक चर्चा; प्रकल्पाचा पुनर्विचार करण्याचे उद्योगमंत्री सामंत यांचे आश्वासन

**रत्नागिरी :** बहुचर्चित वाटद एमआयडीसी आणि डिफेन्स क्लस्टरवरून गेल्या चार-पाच वर्षांपासून सुरू असलेला संभ्रम आणि विरोध अखेर संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. एमआयडीसी विरोधी संघर्ष समिती आणि ग्रामस्थांसोबत झालेल्या अत्यंत सकारात्मक बैठकीनंतर स्थानिकांना त्रास होऊ देणार नाही, असा शब्द देत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी डिफेन्स क्लस्टरचा पुनर्विचार करण्याचे जाहीर आश्वासन दिले.

रत्नागिरी येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी या संपूर्ण घडामोडींविषयी सविस्तर माहिती दिली. या महत्त्वपूर्ण बैठकीला स्थानिक आमदार किरण सामंत, प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲडव्होकेट असीम सरोदे, प्रांताधिकारी यांच्यासह संघर्ष समितीचे प्रतिनिधी प्रथमेश गवाणकर, संतोष बारगुडे आणि त्यांची संपूर्ण टीम उपस्थित होती. प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या या संवेदनशील विषयावर सर्व संबंधितांना एकत्र आणून सकारात्मक संवाद घडवून आणण्यात प्रशासनाला व लोकप्रतिनिधींना यश आले



आहे.

वाटद एमआयडीसीच्या पार्श्वभूमीवर प्रकाश टाकताना उद्योगमंत्री सामंत म्हणाले की, चार ते साडेचार वर्षांपूर्वी जेव्हा या एमआयडीसीची घोषणा झाली, तेव्हापासून या परिसरात दोन स्पष्ट प्रवाह निर्माण झाले होते. एक गट या प्रकल्पाच्या आणि औद्योगिक विकासाच्या बाजूने उभा होता, तर दुसरा गट स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांच्या अधिकारांसाठी या प्रकल्पाला तीव्र विरोध करत होता. या दोन्ही बाजू विचारात घेऊन, राज्याचा उद्योगमंत्री म्हणून आपण केवळ प्रशासकीय भूमिकेतून न बघता, कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी अत्यंत कौटुंबिक, आपुलकीच्या आणि सविस्तर वातावरणात चर्चा केली असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

या बैठकीदरम्यान एमआयडीसी विरोधी कृती समितीने मुख्यत्वे तीन प्रमुख मागण्या प्रशासकीय व राजकीय नेतृत्वापुढे मांडल्या होत्या. यामध्ये पहिली आणि अत्यंत महत्त्वाची मागणी म्हणजे वाटद क्षेत्रात प्रस्तावित असलेल्या डिफेन्स क्लस्टरच्या योजनेचा पुनर्विचार करण्यात यावा. दुसरी मागणी अशी होती की, औद्योगिक क्षेत्राच्या सीमांकनामुळे स्थानिकांच्या व शेतकऱ्यांच्या घरांवर लावण्यात आलेले विविध कायदेशीर निर्बंध किंवा नोंदणीचे शेरे तात्काळ मुक्त करण्यात यावेत. तर तिसरी मागणी म्हणजे, वहिवाटीच्या दाव्यांवर आणि जमिनीच्या हक्कांवर कोणताही राजकीय हस्तक्षेप न करता, अत्यंत निपक्षपातीपणे आणि गुणवत्तेच्या आधारावर स्थानिकांना सातबारे दिले जावेत.

कृती समितीच्या या मागण्यांची गंभीर दखल घेत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तात्काळ प्रशासकीय पावले उचलली आहेत. शेतकऱ्यांच्या घरांवर लावण्यात आलेल्या सर्व नोंदी तात्काळ रद्द करून त्यांची घरे निर्बंधमुक्त करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रांताधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच वहिवाटीच्या सर्व प्रलंबित दाव्यांवर कोणत्याही दबावाशिवाय, केवळ गुणवत्तेच्या आणि वास्तविकतेच्या आधारावर लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या सर्व प्रकरणांवर अत्यंत सकारात्मक आणि ठोस तोडगा काढण्यासाठी अनंत चतुर्दशीचा सण संपल्यानंतर, येत्या सोमवारी किंवा मंगळवारी म्हणजेच २८ किंवा २९ तारखेला प्रांताधिकारी आणि कृती समितीची विशेष संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे.

सर्वात महत्त्वाच्या आणि कळीच्या ठरलेल्या डिफेन्स क्लस्टरच्या मुद्द्यावर बोलताना उद्योगमंत्री सामंत यांनी कृती समितीने मांडलेल्या भूमिकेचे आणि अभ्यासू दृष्टिकोनाचे विशेष कौतुक केले. सुमारे १००० एकर जागेवर प्रस्तावित असलेल्या या डिफेन्स क्लस्टरमुळे जर स्थानिक ग्रामस्थांना, शेतकऱ्यांना किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाला कोणताही त्रास होणार असेल, तर त्याबाबतचा सविस्तर व गोपनीय अहवाल तयार करून तो तात्काळ सादर करण्याचे स्पष्ट आदेश प्रांताधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील वस्तुस्थिती पारखून या क्लस्टरबाबत निश्चितच संवेदनशीलतेने पुनर्विचार केला जाईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. याशिवाय, एमआयडीसी प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राहावी यासाठी गावनिहाय संवाद बैठका घेण्याचे प्रांताधिकारी यांना निर्देशही देण्यात आले आहेत. या बैठकांच्या माध्यमातून ग्रामस्थांचा रोजगार, त्यांची शेतजमीन, कातळाचे मिळणारे योग्य दर आणि भरपाई या सर्व बाबींवर उघडपणे चर्चा केली जाईल. एमआयडीसीचा चेअरमन आणि राज्याचा उद्योगमंत्री या दोन्ही नात्याने आपण पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, अशी ग्वाही त्यांनी दिली. कोणत्याही परिस्थितीत किंवा कोणत्याही दबावाखाली स्थानिक ग्रामस्थांचे नुकसान होऊ दिले जाणार नाही आणि त्यांच्यावर कोणताही अन्याय होऊ देणार नाही, असा शब्द सामंत यांनी दिला.

## शंभर वर्षानंतर मांजराच्या नव्या प्रजातीचा शोध



**मुंबई :** मांजरांच्या कुळाच्या अभ्यासात शास्त्रज्ञांना तब्बल एका शतकानंतर एका नव्या प्रजातीची ओळख पटली आहे. 'लियोपार्डस टिल्कायो' असे या रानमांजराचे नाव असून, ती बोलिव्हियातील युंगासच्या ढगाळ जंगलांमध्ये आढळते. जनुकीय विश्लेषणाच्या आधारे ही मांजर स्वतंत्र प्रजाती असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या शोधामुळे टायगर कॅटच्या वर्गीकरणाबाबत अनेक वर्षांपासून सुरू असलेला वादही संपुष्टात आला आहे. पेरूमध्ये आढळणाऱ्या टायगर कॅटची एक उपप्रजातीही या अभ्यासातून समोर आली असून, तिचे नाव ' ' असे ठेवण्यात आले आहे. यापूर्वी तिला 'नॉर्दर्न टायगर कॅट' मानले जात होते. मात्र, नव्या अभ्यासानुसार ती सुमारे १४ लाख वर्षांपूर्वी इतर संबंधित मांजरांपासून वेगळी झाली होती.

१९२३ मध्ये उरुग्वेयन पांपास मांजराचा शोध लागल्यानंतर, जिवंत मांजराच्या नव्या प्रजातीची नोंद होण्याची ही शतकातील पहिलीच वेळ आहे. स्थानिक लोक या मांजराला 'टिल्कायो' म्हणतात. त्यावरूनच नव्या प्रजातीला हे नाव देण्यात आले आहे.

'टिल्कायो'चे वजन केवळ १.५ ते २ किलोग्रॅम असून, शेपटीविना तिची लांबी सुमारे ५० सेंटीमीटर आहे. शेपटीची लांबी सुमारे २५ सेंटीमीटर असते. बोलिव्हियातील वन्यजीव आश्रमात सुमारे दहा वर्षांपूर्वी आलेल्या 'टिग्रिनो' नावाच्या नर मांजरामुळे या प्रजातीच्या वेगळेपणाकडे शास्त्रज्ञांचे लक्ष गेले. त्याचे स्वरूप इतर मांजरांपेक्षा वेगळे दिसत होते; मात्र, तो स्वतंत्र प्रजातीचा असू शकतो, याची त्यावेळी कल्पना नव्हती, असे अभ्यासाच्या सहलेखिका आणि जीवशास्त्रज्ञ पाओला नोगालेस-अस्कारुंझ यांनी सांगितले.

टायगर कॅटची पहिली नोंद १७७५ मध्ये फ्रेंच गियानामध्ये झाली होती. त्यानंतर दक्षिण अमेरिकेत विविध प्रकारच्या टायगर कॅट आढळल्या. त्यांच्या बाह्य स्वरूपातील साम्यामुळे वर्गीकरणाचा प्रश्न गुंतागुंतीचा बनला होता. आधुनिक जनुकीय विश्लेषणामुळे आता या मांजरांच्या उत्क्रांतीचा इतिहास आणि परस्परसंबंध अधिक स्पष्ट झाले आहेत.

# केमिकल टँकर दरीत कोसळला



**खेड :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील भोस्ते घाटात आज एक भीषण अपघात घडला. गोव्याहून मुंबईच्या दिशेने जाणारा भरधाव केमिकल टँकर महामार्गालगत सुरू असलेल्या बांधकाम क्षेत्रात अनियंत्रित होऊन थेट २०० ते २५० फूट खोल दरीत कोसळला. या भीषण अपघातात संपूर्ण टँकरचा चक्काचूर झाला असला, तरी सुदैवाने चालक यातून आश्चर्यकारकरीत्या बचावला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कंटेनर ट्रक भोस्ते घाटाचा तीव्र उतार उतरत असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर टँकर थेट रस्त्याच्या बाजूला असलेल्या खोल दरीत कोसळला. वाहनावरील केमिकलची टाकी वेगळी होऊन सुमारे २५० फूट खाली आदळल्याने मोठा आवाज झाला आणि परिसरात एकच खळबळ उडाली. वाहनाची झालेली दुरवस्था पाहता जीवितहानीची मोठी भीती व्यक्त केली जात होती; मात्र चालकाला केवळ किरकोळ दुखापती झाल्या असून तो सुखरूप बाहेर पडला.

घटनेची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक पोलीस आणि स्थानिक प्रशासकीय यंत्रणांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. दरीत उतरून युद्धपातळीवर बचावकार्य राबवत पोलिसांनी चालकाला सुरक्षित बाहेर काढले आणि तातडीने वैद्यकीय तपासणीसाठी कळंबोली येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. वाहनात नेमके कोणते रासायनिक द्रव्य होते आणि त्यामुळे परिसरात काही धोका निर्माण होऊ शकतो का, याची खातरजमा करण्यासाठी घटनास्थळी आवश्यक खबरदारीचे उपाय योजण्यात आले आहेत. दरम्यान, घाटातील उतारामुळे ट्रकचे ब्रेक निकामी झाले असावेत, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, अपघात वाहनातील तांत्रिक बिघाडामुळे झाला की इतर काही कारण घडले, याबाबत पोलिसांकडून अधिकृत तपास सुरू आहे. या दुर्घटनेनंतर महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती, ती सुरळीत करण्याचे काम पोलीस यंत्रणेने पूर्ण केले आहे.

## जिल्हा सैनिक मंडळ, ध्वजदिन निधी संकलन समितीची बैठक

**रत्नागिरी :** सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी ध्वजदिन निधी संकलन ३० सप्टेंबरपूर्वी पूर्ण करून, त्याबाबतचा अहवाल जिल्हास्तरीय ध्वजदिन निधी संकलन समितीकडे सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण मंडळाचे अध्यक्ष मनुज जिंदल यांनी दिले. जिल्हा सैनिक मंडळ व जिल्हास्तरीय ध्वजदिन निधी संकलन समितीची बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात नुकतीच पार पडली. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी प्रविंद बिरादार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजयसिंह जाधव उपस्थित होते. बैठकीत युद्ध विधवांना जमिनी उपलब्ध करून देण्याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी यांनी शासनाची जमीन उपलब्धतेबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## गणपती आरतीनंतर राडा; नांदगावात दोघांना मारहाण

**चिपळूण :** गणपतीच्या आरतीनंतर सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या जमिनीच्या वादातून झालेल्या शाब्दिक बाचाबाचीनंतर नांदगाव-भुवडवाडी येथे मारामारी झाल्याची घटना १८ सप्टेंबर रोजी रात्री साडेसातच्या सुमारास घडली. या प्रकरणी सावर्डे पोलिस ठाण्यात नऊ जणांविरोधात दुखापत, मारामारी करून शांततेचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वैभव गणपत ठोंबरे यांच्या घरी गणपतीच्या आरतीसाठी वाडीतील नागरिक जमले होते. आरती झाल्यानंतर वैभव ठोंबरे हे राकेश लाखण व मारुती ठोंबरे यांच्यासोबत सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या जमिनीच्या वादाबाबत चर्चा करत होते. यावेळी त्यांच्यात



शाब्दिक वाद झाला. वैभव यांनी समंजसपणे बोलून हा विषय सोडवूया, असे सांगत असताना तेथे उपस्थित असलेल्या आरोपींनी त्यांना धक्काबुक्की करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे.

या झटापटीत एका आरोपीने हातातील पितळी टाळाने वैभव ठोंबरे यांच्या डोक्यावर मारल्याने त्यांना दुखापत झाली. तसेच दुसऱ्या आरोपीने पितळी टाळाने त्यांच्या पाठीवर मारल्याने मुका मार लागला. दरम्यान, पतीला सोडविण्यासाठी आलेल्या विधी ठोंबरे यांच्या कपाळाला झटापटीदरम्यान टाळ लागल्याने त्यांनाही दुखापत झाली.

या प्रकरणी वैभव गणपत ठोंबरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राकेश सुरेश लाखण, सोमा जिरु लाखण, विजय शंकर ठोंबरे, संजय शंकर ठोंबरे, प्रविण गजानन ठोंबरे, किरण मास्ती ठोंबरे, प्रदीप गजानन ठोंबरे, गजानन लक्ष्मण ठोंबरे आणि मारुती लक्ष्मण ठोंबरे या नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी वैभव ठोंबरे आणि विधी ठोंबरे यांच्यावर उपचार करण्यात आले असून, या प्रकरणाचा पुढील तपास सावर्डे पोलिस करत आहेत.

## माहेरी गेलेल्या महिलेचे बंद घर फोडून दागिने लंपास

**राजापूर :** गौरी-गणपती दर्शनासाठी कुटुंबासह माहेरी गेलेल्या महिलेचे बंद घर फोडून अज्ञात चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ६७ हजार ४६८ रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना खरवते-वाणीवाडी येथे घडली. याप्रकरणी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सानिका संतोष गोरे (वय ४०, रा. खरवते, ता. राजापूर) या १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास आपल्या घराला व गेटला कुलूप लावून पती आणि मुलीसह गौरी-गणपती दर्शनासाठी तळवडे येथे माहेरी गेल्या होत्या. ही संधी साधून अज्ञात चोरट्याने घराच्या मुख्य दरवाज्याचा कडी-कोयंडा हत्याराच्या सहाय्याने तोडून घरात प्रवेश केला. बेडरूममधील कपाटे उघडून सोन्याचे कानातील दागिने, सोन्याची कडी, अंगठी, मणी, नाकातील दागिने, सोन्याचे लॉकेट, चांदीचे पैजण, कमरेची साखळी, चांदीचा नाणे तसेच ३० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ६७ हजार ४६८ रुपयांचा ऐवज चोरून नेला. १९ सप्टेंबर रोजी सकाळी ११.२० वाजता गोरे कुटुंबीय घरी परतल्यानंतर घरफोडी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

## धामापुरात लोकसंवाद अंतर्गत एसआयआर विषयी जनजागृती

**रत्नागिरी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या 'विशेष सखोल पुनरीक्षण' (एसआयआर) मोहिमेच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पात्र नागरिकाने मतदार यादीत आपले नाव नोंदवून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, तसेच मतदार यादीतील नावाची खातरजमा करावी, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गायकवाड यांनी केले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अंतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने संगमेश्वर तालुक्यातील धामापूर येथे सुवर्णसूर्य फाउंडेशनच्या वतीने आयोजित देखावा स्पर्धेतील स्पर्धकांसाठी 'लोकसंवाद २०२६' कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी एसआयआर मोहिमेबाबत उपस्थित ग्रामस्थ आणि नागरिकांना माहिती देण्यात आली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गायकवाड यांनी सांगितले की, मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात बीएलओमार्फत घरोघरी जाऊन १०० टक्के नोंदणी फॉर्म भरून घेण्यात आले आहेत.

## मोटारसायकल कठड्यावर आदळली; एकाचा मृत्यू

**खेड :** आंबडसहून भेलसईकडे येताना मोटारसायकलवरील तिघांचा ताबा सुटून ती पुलाच्या सिमेंटच्या कठड्यावर आदळल्याने झालेल्या अपघातात ३४ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले. हा अपघात १२ सप्टेंबर रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास भेलसई चौथाई येथील भेलसई पुलाच्या मागील बाजूस असलेल्या वळणावरील उतारात घडला.

या अपघातात रुपेश सुरेश धाडवे (वय ३४, रा. भेलसई गंग धाडवेवाडी, ता. खेड) यांचा मृत्यू झाला. सर्वेश शिवाजी धाडवे यांच्या उजव्या डोळ्याजवळ दुखापत झाली असून, दर्शन अनंत धाडवे (वय २१) यांच्या उजव्या हाताच्या करंगळीच्या जवळील बोटाला दुखापत झाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दर्शन धाडवे, त्यांचे चुलत भाऊ रुपेश धाडवे आणि सर्वेश धाडवे हे तिघे आंबडस येथे चायनीज खाऊन यामाहा मोटारसायकल (एमएच ४३ सीएफ २१७७) वरून आंबडस-भेलसई मार्गे भेलसईकडे परत येत होते. भेलसई पुलाजवळील वळणाच्या उतारावर रुपेश धाडवे यांनी मोटारसायकल रस्त्याच्या परिस्थितीकडे लक्ष न देता निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालविल्याने मोटारसायकलवरील नियंत्रण सुटले. त्यानंतर मोटारसायकल पुलाच्या सिमेंटच्या कठड्यावर जोरात आदळली.

या अपघातात रुपेश यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. तसेच मोटारसायकलच्या पुढील भागाचे, शो व हेडलाईटचे नुकसान झाले. अपघातानंतर दर्शन धाडवे मुंबई येथे गेले होते. त्यानंतर १९ सप्टेंबर रोजी ते खेड पोलिस ठाण्यात हजर राहून दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

या प्रकरणी खेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातासंदर्भातील चौकशी पूर्ण झाल्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास खेड पोलिस करीत आहेत.

## थोडक्यात महत्वाचे

### केतन अग्रवाल प्रकरणात २ हजारांहून अधिक पानांचं दोषारोपपत्र



**पुणे :** संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतलेल्या केतन अग्रवाल मृत्यू प्रकरणाच्या तपासात आता नवनवीन धक्कादायक माहिती समोर येत आहे. केतनची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा कथित प्रियकर चेतन चौधरी हे दोघेही अटकेत असून, पुणे पोलिसांनी तपास पूर्ण केल्यानंतर आता या प्रकरणात मोठे पाऊल उचलले आहे. केतन अग्रवालच्या मृत्यूला तब्बल ९३ दिवस पूर्ण झाल्यानंतर, शनिवारी १९ सप्टेंबर रोजी पुणे पोलीस न्यायालयात २ हजार पानांहून अधिकचे दोषारोपपत्र दाखल करणार आहेत. या दोषारोपपत्रात आरोपींविरोधातील विविध महत्वाचे पुरावे सादर केले जाणार आहेत. यामध्ये कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर), सीसीटीव्ही फुटेज, वैद्यकीय अहवाल तसेच घटनास्थळाचा पंचनामा यांचा समावेश असल्याचे समोर आले आहे. पोलिसांच्या तपासानुसार, १८ जून रोजी केतनला लोहगडावरून खाली ढकलण्यापूर्वीच सिया आणि चेतनने कथितरित्या हत्येचे नियोजन केले होते. केतनचा मृत्यू अपघाती असल्याचे भासवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा पोलिसांचा आरोप आहे. यापूर्वीही दोघांनी हत्येच्या प्रयत्नासाठी रिहर्सल केल्याचे तपासात समोर आल्याचे वृत्त आहे. दरम्यान, पोलिसांनी आरोपींच्या मोबाईलमधून डिलीट केलेला डेटा रिकव्हर करताना काही वेब लिंक्स शोधून काढल्याचे सांगितले जात आहे. तपास यंत्रणेला आरोपींनी गुन्ह्यापूर्वी सुमारे दोन तास जपानी व्हिडिओ पाहिल्याचे डिजिटल पुराव्यांतून आढळल्याची माहितीही समोर आली आहे. या प्रकरणात सिया आणि चेतनकडून एकमेकांवर आरोप करण्यात आल्याचेही तपासादरम्यान समोर आले होते. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, दोघांनी केतनच्या हत्येची जबाबदारी एकमेकांवर ढकलण्याचा प्रयत्न केला. तब्बल २ हजारांहून अधिक पानांच्या दोषारोपपत्रातून पोलिसांनी नेमके कोणते पुरावे न्यायालयासमोर ठेवले आहेत आणि या प्रकरणातील तपासाची दिशा काय आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### गोमाता संवर्धनासाठी हिंदू समाजाने विचार करण्याची गरज: तन्मय जाधव

**रत्नागिरी :** गोमाता आणि भटक्या जनावरांच्या वाढत्या समस्यांसाठी केवळ शासनाला दोष देऊन चालणार नाही, तर हिंदू समाजानेही आता विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन गड किल्ले संवर्धन प्रतिष्ठान रत्नागिरी विभाग संपर्क प्रमुख तन्मय जाधव यांनी केले आहे. मोठमोठे उत्सव, भव्य मंडप आणि मंदिरांमधील दानाचा काही हिस्सा गौमाता संवर्धन, चारा, निवारा व पशुवैद्यकीय सेवेसाठी वापरता येईल का, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. मंदिरांमधील दानातील ५०% रक्कम (नियम व कायदेशीर व्यवस्थेनुसार) चारा, पाणी आणि उपचारांसाठी वापरता येऊ शकते.

# स्कॉर्पिओच्या धडकेनंतर ऑरा कारने घेतला पेट





**लांजा :** मुंबई-गोवा महामार्गावरील वाकेड घाटात शनिवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात होऊन ऑरा कारने पेट घेतल्याने 'बर्निंग कार'चा थरार पाहायला मिळाला. उभ्या असलेल्या ऑरा कारला स्कॉर्पिओने जोरदार धडक दिल्यानंतर ही आग लागली. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मुंबईहून गोव्याच्या दिशेने जाणारी ऑरा कार अपघातामुळे महामार्गाच्या कडेला उभी होती. त्याचवेळी गोव्याकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या स्कॉर्पिओ कारने उभ्या असलेल्या ऑरा कारला जोरदार धडक दिली. धडकेनंतर ऑरा कारने अचानक पेट घेतला. काही क्षणांतच आगीने संपूर्ण कारला वेढा दिला आणि पाहता पाहता कार आगीच्या भक्ष्यस्थानी पडून बेचिराख झाली.

अपघातानंतर वाहनातील प्रवाशांनी वेळीच बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. सर्व प्रवासी सुखरूप बचावले असून या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

घटनेची माहिती मिळताच लांजा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलकंठ बगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मारळकर, पोलीस अंमलदार नासिर नावळेकर, स्वप्नील कदम, विलास जाधव आणि सचिन बळीप यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच महामार्ग पोलिस देखील हजर झाले.राजापूर नगरपरिषद अग्निशमन दलाच्या जवानांनीही तत्काळ घटनास्थळी दाखल होत पाण्याचा मारा करून ऑरा कारला लागलेली आग आटोक्यात आणली.

या अपघातामुळे मुंबई-गोवा महामार्गावर काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला. पोलिसांनी घटनास्थळी परिस्थिती नियंत्रणात आणत वाहतूक सुरळीत केली. या अपघाताचा अधिक तपास लांजा पोलीस करत आहेत.

### महिला बचत गटांना २५ हजारांचे खेळते भांडवल

**मुंबई :** राज्य व केंद्र शासन पुरस्कृत दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना आता तब्बल २५ हजार रुपयांचे खेळते भांडवल उपलब्ध करून दिले जाणार आहे. स्वयंसहाय्यता गटांना प्रति सदस्य १ हजार रुपयांप्रमाणे प्रति गट १०,००० रुपये खेळते भांडवल देण्यात येत होते, त्यात आता वाढ करून दिली जाणार आहे. केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान व राज्य शासन पुरस्कृत राज्य नागरी उपजिविका अभियानाची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या धोरणानुसार केंद्र शासन पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना संपुष्टात आली आहे.

## सोनवी नदीपात्रातील दुर्घटनेनंतर संताप; मृतदेह स्वीकारण्यास नातेवाईकांचा नकार

**संगमेश्वर :** माभळे येथे गणेश विसर्जनावेळी सोनवी नदीपात्रात बुडून प्रज्वल पुरुषोत्तम घडशी या तरुणाचा मृत्यू झाल्याने परिसरात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या घटनेला नदीपात्रातील खोदकामातून निर्माण झालेले धोकादायक खड्डा कारणीभूत असल्याचा आरोप नातेवाईक आणि ग्रामस्थांनी केला आहे.



महामार्ग चौपदरीकरणाच्या कामासाठी नदीपात्रात गाळ काढणे आणि भरावासाठी खोदकाम करण्यात आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

या कामामुळे नदीपात्रात खोल खड्डे तयार झाले असून, गणेश विसर्जनावेळी प्रज्वल त्यातील पाण्यात बुडाला, असा दावा करण्यात आला.

घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी प्रज्वलचा मृतदेह ताब्यात घेण्यास नकार देत संबंधित ठेकेदारावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. केवळ प्रशासकीय चौकशी न करता मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

या प्रकरणात प्रशासनाने पाच दिवसांत चौकशी करून अहवाल देण्याचे लेखी आश्वासन दिल्याची माहिती आहे. मात्र, प्रज्वलच्या कुटुंबीयांना तातडीने न्याय मिळावा, या मागणीवर नातेवाईक व ग्रामस्थ ठाम आहेत.

या वेळी संतोष थेराडे यांनीही आक्रमक भूमिका घेत प्रशासनाकडे घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली. प्रशासनाच्या आश्वासनानंतर पुढील भूमिका काय राहणार, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

## अमली पदार्थांविरोधात मोठी धडक; १६ गुन्हे दाखल, २२ जण ताब्यात





**रत्नागिरी :** जिल्ह्यात अमली पदार्थांची बेकायदेशीर विक्री, साठवणूक आणि सेवन करणाऱ्या घटकांविरोधात पोलिसांनी कडक पावले उचलली असून 'मिशन फिनिक्स' अंतर्गत राबवलेल्या विशेष मोहिमेत धडक कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक नितीन दत्तात्रय बगाटे आणि अपर पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी यांच्या थेट मार्गदर्शनाखाली ८ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर या कालावधीत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ही व्यापक मोहीम राबवण्यात आली. या कारवाईदरम्यान पोलिसांनी अमली पदार्थांच्या गैरव्यवहारात गुंतलेल्या ड्रग्ज पेडलर्ससह नशेखोरांवर जोरदार कारवाई करत एकूण १६ गुन्हे दाखल केले असून २२ संशयित आरोपींना अटक करण्यात यश मिळवले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या विशेष मोहिमेत अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांविरोधात १० गुन्हे आणि अंमली पदार्थ जवळ बाळगल्याप्रकरणी ६ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. या संयुक्त छाप्यांमध्ये ७७ हजार रुपये किमतीचे ५.१५ ग्रॅम ब्राऊन हेरॉईन तसेच १ लाख २५ हजार २०० रुपये किमतीचा २.५११ किलोग्रॅम गांजा असा एकूण २ लाख २ हजार २०० रुपयांचा नशिल्या पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे. तरुण पिढीला आणि समाजाला अमली पदार्थांच्या घातक विळख्यातून बाहेर काढण्यासाठी 'मिशन फिनिक्स' अंतर्गत केवळ प्रतिबंधात्मक कारवायाच नव्हे, तर जनजागृतीपर उपक्रमही हाती घेण्यात आले आहेत.

जिल्ह्यात अवैध अमली पदार्थांची तस्करी किंवा विक्री करणाऱ्यांवर यापुढेही अशीच कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई सुरू राहील, असा सज्जड इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे. तसेच जिल्ह्यातील कोणत्याही भागात अमली पदार्थांची विक्री, साठवणूक, वाहतूक किंवा सेवन होत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा अथवा रत्नागिरी पोलीस दलाच्या 'रत्नसेतू चॅटबॉट' (९३७१४१५६१२) वर गोपनीय माहिती देऊन सहकार्य करावे, असे अधिकृत आवाहन जिल्हा पोलीस दलाकडून करण्यात आले आहे.

**सुविचार : मौन हे उत्तम उत्तर.**

## दिनविशेष

**आंतरराष्ट्रीय शांतता दिन:** जगात शांतता, सौहार्द आणि अहिंसेचा प्रसार व्हावा या उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे हा दिवस साजरा केला जातो.

**१९६८:** भारताची बाह्य गुप्तचर संस्था रिसर्च अँड ॲनालिसिस विंग ची अधिकृत स्थापना झाली.

**१९४८:** प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया ची औपचारिक स्थापना करण्यात आली.

**१७९२:** फ्रान्समध्ये राजेशाही संपुष्टात येऊन फ्रेंच प्रजासत्ताकची अधिकृत घोषणा झाली.

## जन्मदिन

**१८९५:** महाराजा हरी सिंग जम्मू आणि काश्मीर संस्थानाचे अंतिम शासक.

**१९८०:** करीना कपूर प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्री.

**१९१२:** फिरोज गांधी भारतीय स्वातंत्र्यसेनानी आणि प्रसिद्ध राजकीय नेते.

**१९७९:** ख्रिस गेल वेस्ट इंडिजचा आक्रमक फलंदाज.

## पंचांग

| | |
|---|---|
| **दिनांक** | : **२१ सप्टेंबर २०२६** |
| **वार** | : रविवार |
| **मराठी महिना** | : श्रावण (शालिवाहन शके १९४७) |
| **पक्ष** | : शुक्ल पक्ष |
| **तिथी** | : दशमी |
| **सूर्योदय** | : सकाळी ०६:२५ वा. |
| **सूर्यास्त** | : सायंकाळी ०६:३४ वा. |
| **चंद्रोदय** | : दुपारी ०३:०१ वा. |
| **चंद्रास्त** | : रात्री ०१:२५ वा. |

## राशीभविष्य

**मेष :** कामाच्या ठिकाणी नवीन जबाबदाऱ्या मिळतील, आर्थिक निर्णय विचारपूर्वक घ्या.

**वृषभ :** प्रलंबित कामे मार्गी लागतील आणि कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.

**मिथुन :** संवाद कौशल्यामुळे लाभ होईल, आरोग्याची विशेष काळजी घ्या.

**कर्क :** कौटुंबिक बाबींवर खर्च वाढेल, मानसिक शांतता जपा.

**सिंह :** आत्मविश्वासात वाढ होईल आणि आत्मसन्मान जपणाऱ्या चांगल्या बातम्या मिळतील.

**कन्या :** व्यवसायात आर्थिक आवक उत्तम राहील, सहकाऱ्यांचे चांगले सहकार्य लाभेल.

**तूळ :** नवीन कामाच्या योजना यशस्वी होतील, मित्रांच्या भेटीने आनंद मिळेल.

**वृश्चिक :** नोकरीत वरिष्ठांचे सहकार्य मिळेल, घाईगडबडीत कोणतेही निर्णय घेऊ नका.

**धनु :** नशिबाची साथ लाभेल, धार्मिक किंवा अध्यात्मिक कार्यात सहभाग वाढेल.

**मकर :** अचानक धनलाभाची शक्यता आहे, पण वाहने सावधगिरीने चालवा.

**कुंभ :** भागीदारीच्या व्यवसायात यश मिळेल, वैवाहिक जीवनात गोडवा राहील.

**मीन :** जुन्या समस्यांमधून मार्ग निघेल आणि प्रवासाचे शुभ योग जुळून येतील.

# आंतरराष्ट्रीय शांतता दिन: अहिंसा आणि जागतिक सौहार्दाचा संदेश

दरवर्षी २१ सप्टेंबर रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय शांतता दिन मोठ्या उत्साहात आणि गांभीर्याने साजरा केला जातो. युनायटेड नेशन्स म्हणजेच संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे या दिवसाची सुरुवात करण्यात आली. जगातील वाढता हिंसाचार, युद्धे, द्वेष आणि परस्पर अविश्वास दूर करून शांतता, सौहार्द आणि अहिंसेचा प्रसार करणे हा या विशेष दिवसाचा मुख्य उद्देश आहे. आजच्या आधुनिक आणि डिजिटल युगात जिथे तंत्रज्ञान वेगाने प्रगती करत आहे, दुर्दैवाने तिथेच मानवी मनात अस्वस्थता, राष्ट्र-राष्ट्रांमध्ये तणाव आणि सीमेवर संघर्ष वाढताना दिसत आहेत. अशा काळात आंतरराष्ट्रीय शांतता दिनाचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते.शांतता म्हणजे केवळ युद्धाचा अभाव नव्हे, तर जिथे प्रत्येक माणसाला आदराने, सुरक्षेने आणि न्यायाने जगता येईल असे वातावरण निर्माण करणे होय. जेव्हा समाजात जातीय, धार्मिक, प्रांतीय किंवा आर्थिक मतभेद वाढतात, तेव्हा शांततेचा पाया ढळतो. संयुक्त राष्ट्रसंघ दरवर्षी या दिनानिमित्त एक विशेष मध्यवर्ती कल्पना जाहीर करतो, ज्याद्वारे जगातील सर्व देशांना एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले जाते. न्यू यॉर्क येथील संयुक्त राष्ट्रसंघाच्या मुख्यालयात शांततेची घंटा वाजवून या दिवसाची अधिकृत सुरुवात केली जाते. या घंटेवर ''जगात पूर्ण शांतता नांदो'' असे सुंदर शब्द कोरलेले आहेत.शांतता प्रस्थापित करण्याची जबाबदारी केवळ मोठमोठे देश किंवा राजकीय नेत्यांचीच आहे असे नाही. प्रत्येक नागरिकाची यामध्ये मोलाची भूमिका असते. आपण आपल्या रोजच्या व्यवहारात, कुटुंबात, समाजात आणि सोशल मीडियावर एकमेकांशी कसे वागतो, यावर शांततेचे वातावरण अवलंबून असते. द्वेषयुक्त भाषणे टाळणे, दुसऱ्याच्या विचारांचा आदर करणे, अहिंसेचा मार्ग स्वीकारणे आणि कोणत्याही समस्येवर संवादाने तोडगा काढणे ही खरी शांततेची सुरुवात आहे. महात्मा गांधींनी म्हटले होते, ''शांततेचा कोणताही वेगळा मार्ग नाही, शांतता हाच एकमेव मार्ग आहे.'' त्यांच्या या विचारांची आज संपूर्ण जगाला अत्यंत गरज आहे.जागतिक शांतता टिकून राहण्यासाठी गरिबी, अशिक्षितपणा, असमानता आणि हवामान बदल यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर मात करणे आवश्यक आहे. कारण जेव्हा मानवी हक्कांचे उल्लंघन होते किंवा भुकेची समस्या निर्माण होते, तेव्हा असंतोष पसरून शांतता धोक्यात येते. म्हणूनच शिक्षण आणि नैतिक मूल्यांच्या माध्यमातून नवीन पिढीमध्ये शांततेचे संस्कार रुजवणे गरजेचे आहे.आंतरराष्ट्रीय शांतता दिन हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून तो निरंतर चालणारा एक विचार आहे. २४ तासांसाठी युद्धबंदी जाहीर करून शांततेचा अनुभव घेणे हा या दिवसाचा एक भाग असला, तरी वर्षभराचे ३६५ दिवस शांततेने जगणे हे मानवाचे अंतिम ध्येय असले पाहिजे. आजच्या दिवशी आपण सर्वांनी हिंसा, द्वेष आणि अहंकार सोडून प्रेम, सहकार्य आणि अहिंसेचा स्वीकार करण्याचा संकल्प करायला हवा. जगभरातील प्रत्येक मानवाला शांततेत आणि आनंदाने जगता यावे, हीच या दिवसाची खरी फलश्रुती ठरेल.

## सौंदर्य टीप्स

# लिंबाचा नैसर्गिक उपाय

हिवाळा असो वा उन्हाळा, डोक्यातील कोंडा ही आजकाल लहानांपासून मोठ्यांपर्यंत अनेकांसाठी एक त्रासदायक समस्या बनली आहे. टाळूची त्वचा कोरडी पडणे, मृत त्वचेचे पांढरे खवले उडणे आणि सतत येणारी खाज यामुळे अनेकदा चारचौघात मान खाली घालावी लागते. बाजारात कोंडा घालवण्यासाठी अनेक प्रकारचे महागडे अँटी-डँड्रफ शाम्पू उपलब्ध आहेत, परंतु त्यातील रसायनांमुळे केस रुक्ष आणि कमजोर होण्याची शक्यता असते. अशा वेळी आपल्या स्वयंपाकघरात सहज उपलब्ध असणारे दही आणि लिंबाचा रस हा घरगुती उपाय अतिशय प्रभावी आणि सुरक्षित ठरतो.दही आणि लिंबू या दोघांमध्येही टाळूचे आरोग्य सुधारण्यासाठी आवश्यक असणारे नैसर्गिक गुणधर्म मुबलक प्रमाणात असतात. दह्यामध्ये लॅक्टिक ॲसिड असते, जे टाळूवरील मृत त्वचा काढून टाकण्यास आणि त्वचेची छिद्रे स्वच्छ करण्यास मदत करते. याशिवाय दही हे एक उत्तम नैसर्गिक मॉइश्चरायझर असल्याने ते टाळूचा कोरडेपणा पूर्णपणे दूर करते आणि केसांना मुळापासून पोषण देऊन मऊ व चमकदार बनवते. दुसरीकडे, लिंबामध्ये सायट्रिक ॲसिड आणि व्हिटॅमिन-सी भरपूर प्रमाणात असते. लिंबाच्या रसातील अँटी-फंगल आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म कोंड्याला कारणीभूत असणाऱ्या बुरशीची वाढ रोखतात आणि टाळूचा नैसर्गिक पीएच स्तर संतुलित ठेवतात.हा उपाय करण्यासाठी अर्धी वाटी ताजे आणि थोडे आंबट दही घ्या. त्यात एका ताज्या लिंबाचा रस चांगला मिसळून मऊ पेस्ट तयार करा. ही पेस्ट बोटांच्या साहाय्याने केसांच्या मुळाशी म्हणजेच टाळूला सर्व बाजूने व्यवस्थित लावा. लावून झाल्यावर ५ ते १० मिनिटे हलक्या हाताने मसाज करा, ज्यामुळे रक्ताभिसरण सुधारेल. ही पेस्ट टाळूवर साधारण २० मिनिटे तशीच राहू द्या. २० मिनिटांनंतर केस कोमट किंवा साध्या पाण्याने आणि कोणत्याही सौम्य किंवा सल्फेट-मुक्त शाम्पूने धुवून टाका.हा प्रयोग आठवड्यातून एकदा किंवा दोनदा नियमित केल्यास डोक्यातील कोंडा वेगाने कमी होतो आणि खाज येणे पूर्णपणे थांबते. तसेच दह्यामुळे केस गळणे कमी होऊन त्यांना नैसर्गिक चमक आणि मऊपणा प्राप्त होतो. जर तुमची त्वचा अतिसंवेदनशील असेल तर लिंबाचे प्रमाण थोडे कमी ठेवावे. रासायनिक उपचारांपेक्षा हा सोपा, स्वस्त आणि नैसर्गिक मार्ग अवलंबून तुम्ही तुमचे केस कायमस्वरूपी कोंडामुक्त, मजबूत आणि सुंदर ठेवू शकता.

## बोधकथा



# जादूची अंगठी आणि गरीब शेतकरी

एका छोट्या गावात सोमा नावाचा एक अतिशय प्रामाणिक पण गरीब शेतकरी राहत होता. तो दिवसरात्र शेतात कष्ट करायचा, पण तरीही त्याच्या कुटुंबाचे हाल संपत नव्हते. एक दिवस शेतात नांगरणी करत असताना त्याच्या फाळाला एक धातूची पेटी धडकली. सोमाने उत्सुकतेने ती पेटी उघडली, तर त्यात एक चमकणारी सुंदर अंगठी होती. त्याने ती अंगठी बाहेर काढली आणि त्यावर साचलेली धूळ हाताने साफ केली.अचानक त्या अंगठीतून एक दिव्य प्रकाश बाहेर पडला आणि एक यक्ष प्रकट झाला. यक्ष म्हणाला, ''हे मानवा, तू मला अनेक वर्षांच्या बंदीवासातून मुक्त केलेस. ही एक जादूची अंगठी आहे. तू या अंगठीला हात लावून जी इच्छा मागशील, ती क्षणात पूर्ण होईल. पण लक्षात ठेव, या अंगठीचा वापर फक्त स्वतःच्या किंवा इतरांच्या चांगल्यासाठीच कर.''सोमाला आधी विश्वास बसला नाही, पण त्याने चाचणी घेण्यासाठी मनात विचार केला आणि आपल्या घरी खूप सारे धान्य मागितले. घराकडे जाऊन पाहतो तर काय, त्याचे घर धान्याच्या पोत्याने भरले होते. सोमाच्या आनंदाला सीमा उरली नाही. त्याने हळूहळू आपल्या घराची दुरुस्ती केली, चांगला पोषाख घेतला आणि नवीन शेती अवजारे खरेदी केली.परंतु सोमा स्वाभिमानी आणि दयाळू होता. त्याने जादूच्या अंगठीचा वापर करून गावात शाळा बांधली, गरिबांना जेवण दिले आणि आजारी लोकांसाठी औषधोपचार उपलब्ध करून दिले. गावाची प्रगती पाहून शेजारच्या गावातील एका लोभी व्यापाराला सोमाच्या या अचानक श्रीमंत होण्याचा संशय आला. त्याने गुपचूप सोमाच्या घरावर लक्ष ठेवले आणि जादूच्या अंगठीचे रहस्य शोधून काढले.एका रात्री त्या लोभी व्यापाराने सोमाची जादूची अंगठी चोरली. तो आनंदाने जंगलात गेला आणि अंगठी घासत म्हणाला, ''मला जगातला सर्वात मोठा सोन्याचा महल हवा आहे आणि अमर्याद संपत्ती हवी आहे!'' यक्षाने त्याची इच्छा पूर्ण केली आणि त्याच्याभोवती सोन्याचा भव्य वाडा उभा राहिला. पण त्या व्यापाराचा लोभ इथेच थांबला नाही. तो पुन्हा म्हणाला, ''मला या संपूर्ण राज्याचा राजा बनव आणि मला अडवणाऱ्या सर्वांना नष्ट कर.''त्या व्यापाराची ही दुष्ट इच्छा ऐकून अंगठीतील यक्ष रागावला. लोभापोटी केलेल्या या दुष्ट इच्छेमुळे जादूच्या अंगठीची शक्ती नष्ट झाली. तो सोन्याचा वाडा क्षणात नाहीसा झाला आणि तो व्यापारी जंगलातील एका खोल दरीत फेकला गेला. दुसऱ्या दिवशी सोमाला अंगठी चोरीला गेल्याचे समजले, पण त्याने शोक केला नाही. तो पुन्हा आपल्या जुन्या शेतात गेला आणि प्रामाणिकपणे कष्ट करू लागला.

**कथेचा बोध**

जास्त लोभ हा नेहमी विनाशाकडे घेऊन जातो. प्रामाणिकपणा आणि कष्टाने मिळवलेला आनंदच कायम टिकतो; वाईट मार्गाने किंवा लोभाने मिळवलेली संपत्ती कधीही सुखाचा मार्ग दाखवू शकत नाही.

# आशियाई क्रीडा महाकुंभ: भारताची उत्तुंग कामगिरी

जपानमधील नागोया येथे नुकताच २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेचा भव्य आणि दिमाखदार औपचारिक प्रारंभ झाला असून, पहिल्याच दिवसापासून भारतीय खेळाडूंनी दाखवलेली उत्तुंग कामगिरी ही केवळ पदकांची लयलूट नाही, तर ती एका नव्या, आत्मविश्वासू आणि क्रीडानिष्ठ भारताच्या उदयाची खंबीर ग्वाही देणारी ठरत आहे. नेमबाजी, क्रिकेट आणि हॉकी यासारख्या विविध खेळांमध्ये भारताने मिळवलेली आक्रमक आणि आश्वासक सुरुवात ही योगायोग नसून, गेल्या काही वर्षांत देशात आकार घेतलेल्या सर्वसमावेशक क्रीडा संस्कृतीचे मधुर फळ आहे. एकेकाळी क्रीडा जगतात भारत म्हणजे केवळ क्रिकेट असे जे पारंपरिक समीकरण जगभरात रूढ झाले होते, त्याला अत्यंत समर्थपणे छेद देत आज भारताचा तिरंगा ॲथलेटिक्सच्या धावपट्टीपासून ते नेमबाजीच्या टार्गेट रेंजपर्यंत आणि हॉकीच्या टर्फवरून ते बॅडमिंटन, कुस्ती व बॉक्सिंगच्या रिंगपर्यंत सर्वत्र अत्यंत अभिमानाने आणि दबदब्याने फडकताना दिसत आहे. आशियाई खेळांसारख्या आंतरराष्ट्रीय महाकुंभात चीन, जपान आणि दक्षिण कोरियासारख्या पारंपरिक क्रीडा महासत्तांच्या आव्हानाला डोळ्यात डोळे घालून सामोरे जात भारतीय खेळाडू ज्या आत्मविश्वासाने आणि आक्रमक जिद्दीने मैदानात उतरत आहेत, ते पाहता भारतीय क्रीडा विश्वाने घेतलेली ही झेप खरोखरच अभूतपूर्व आणि ऐतिहासिक मानली पाहिजे. या घवघवीत आणि नेत्रदीपक यशामागे केवळ खेळाडूंचे वैयक्तिक अथक परिश्रम किंवा नशीब कारणीभूत नसून, देशातील क्रीडा क्षेत्राच्या संपूर्ण रचनेत, धोरणांमध्ये आणि एकूणच सामाजिक मानसिकतेत झालेला आमुलाग्र बदल मुख्यत्वे कारणीभूत आहे. भूतकाळात आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या अवघ्या काही महिने आधी जुजबी तयारी करणे, पायाभूत सोयी-सुविधांचा कमालीचा अभाव असणे, अपुरे व कालबाह्य प्रशिक्षण आणि प्रशासकीय पातळीवरील उदासीनता यामुळे भारतीय खेळाडूंना आंतरराष्ट्रीय मंचावर केवळ सहभागातच आनंद मानण्यावर समाधान मानावे लागत असे. परंतु आज चित्र संपूर्णपणे पालटले आहे; खेलो इंडिया आणि टारगेट ऑलिम्पिक पोडियम स्कीम (टीओपीएस) सारख्या क्रांतिकारी व दूरदृष्टीच्या सरकारी उपक्रमांमुळे देशातील गल्लीबोळातील, आदिवासी भागातील आणि ग्रामीण भागातील सूक्ष्म गुणवंत खेळाडूंना अतिशय बालवयातच शोधून त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण दिले जात आहे. त्यांना अत्याधुनिक क्रीडा साहित्य, सर्वोत्तम देश-विदेशातील प्रशिक्षक आणि सातत्याने परदेशी भूमीवर होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सरावाची प्रत्यक्ष संधी उपलब्ध करून दिली जात आहे. याशिवाय, आधुनिक युगात केवळ शारीरिक ताकदीवर खेळ जिंकता येत नाहीत हे ओळखून क्रीडा विज्ञानाची मदत, शास्त्रोक्त आणि वैयक्तिक गरजांनुसार ठरवलेला आहार, हाय-परफॉर्मन्स लॅब्ज, मानसिक दबाव आणि ताणतणाव लीलया हाताळण्यासाठी क्रीडा मानसोपचार तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि दुखापतीमधून वेगाने सावरण्यासाठी अत्याधुनिक वैद्यकीय पुनर्वसन सुविधा खेळाडूंना २४ तास उपलब्ध करून दिल्या जात आहेत. यामुळे भारतीय खेळाडूंचा तांत्रिक दर्जा, रणनीती आखण्याची क्षमता आणि शारीरिक तंदुरुस्ती जागतिक स्तरावरील अव्वल खेळाडूंच्या तोडीची बनली आहे. कॉर्पोरेट क्षेत्राकडून मिळणारा सीएसआर निधी, विविध क्रीडा अकादमींची उभारणी आणि क्रीडा व्यवस्थापनातील व्यावसायिकता यामुळे खेळाडूंना आर्थिक अनिश्चिततेतून मुक्ती मिळून स्थैर्य लाभले आहे, ज्यामुळे ते आपले पूर्ण लक्ष, ऊर्जा आणि ध्यास केवळ आणि केवळ खेळातील गुणवत्तेवर केंद्रित करू शकत आहेत. आजचा भारतीय खेळाडू हा मैदानात उतरताना कोणत्याही आंतरराष्ट्रीय प्रतिस्पर्ध्याच्या दबावाखाली न येता, विजयाची दावेदारी सांगण्याच्या आत्मविश्वासाने भरलेला असतो. नेमबाजीत क्षणाक्षणाला अचूक वेध घेणारे आपले युवा नेमबाज, ॲथलेटिक्समध्ये सेकंदाच्या हजाराव्या भागाची वेळ सुधारण्यासाठी जिद्द पणाला लावणारे धावपटू, मैदानावर उत्कृष्ट ताळमेळ आणि आक्रमक रणनीतीने प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम करणारी पुरुष व महिला हॉकी टीम, आणि जागतिक मंचावर आपले वर्चस्व कायम राखणारे क्रिकेटपटू - हे सर्व घटक मिळून एका परिपूर्ण, संतुलित आणि सशक्त क्रीडा परिसंस्थेचे सुंदर चित्र रेखाटत आहेत. यातही विशेष आवर्जून नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे देशातील महिला खेळाडूंची ही क्रीडा क्रांतीमधील मध्यवर्ती भूमिका होय. सामाजिक चौकटी, रूढी-परंपरा, कौटुंबिक अडचणी आणि पायाभूत सुविधांच्या अभावावर मात करत देशाच्या कानाकोपऱ्यातून पुढे आलेल्या कन्यकांनी आशियाई खेळात सुवर्ण आणि रौप्यपदकांना गवसणी घालत संपूर्ण राष्ट्राची मान अभिमानाने आणि आदराने उंचावली आहे. आशियाई क्रीडा स्पर्धा ही केवळ पदकांची संख्या वाढवण्याची शर्यत नसून, ती आगामी ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेची पूर्वतयारी आणि खेळाडूंची कसून परीक्षा घेणारी जगातील सर्वात मोठी प्रयोगशाळा आहे. आशियातील सर्वोत्तम आणि जागतिक दर्जाच्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध खेळताना मिळणारा प्रदीर्घ अनुभव, अतिउच्च मानसिक दबावाखाली प्रत्यक्ष कामगिरी करण्याची सवय आणि रणनीतीची तंतोतंत अंमलबजावणी या सर्व गोष्टी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकण्याचा पाया मजबूत करतात. नागोया येथील या आशियाई क्रीडा महाकुंभात मिळणारे प्रत्येक पदक आणि घडणारा प्रत्येक नवा राष्ट्रीय विक्रम हा भारताला आगामी ऑलिम्पिकमधील ऐतिहासिक विजयाच्या अधिक जवळ घेऊन जाणारा एक-एक मजबूत टप्पा आहे. आज भारतात क्रीडा क्षेत्राकडे केवळ वेळ घालवण्याचा एक छंद किंवा करमणुकीचे दुय्यम साधन म्हणून पाहिले जात नसून, त्याकडे एक अत्युच्च सन्मानजनक कारकीर्द, राष्ट्र उभारणीचे कार्य आणि राष्ट्रीय अभिमानाचे मुख्य माध्यम म्हणून पाहिले जात आहे, हा झालेला विचारसरणीतील सकारात्मक बदल हाच आपला सर्वात मोठा विजय आहे. लहान मुलांच्या हातात केवळ पुस्तके किंवा मोबाईल न देता, त्यांच्या आवडीनुसार रॅकेट, धनुष्यबाण, किंवा धावण्याचे शूज देताना पालक आता अजिबात कचरत नाहीत, कारण क्रीडा क्षेत्रातही सुरक्षित, उज्वल भविष्य आणि जागतिक प्रतिष्ठा मिळू शकते याचा दृढ विश्वास समाजात निर्माण झाला आहे. अर्थात, या यशाचा जल्लोष साजरा करत असतानाच आपल्याला खेळातील पायाभूत सुविधांचा विस्तार केवळ मोठ्या शहरांपुरता मर्यादित न ठेवता तो जिल्हा, तालुका आणि गावपातळीपर्यंत नेणे, क्रीडा संघटनांमधील प्रशासकीय पारदर्शकता व उत्तरदायित्व कायम राखणे आणि कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाशिवाय केवळ आणि केवळ शुद्ध गुणवत्तेला प्राधान्य देणे या गोष्टींवर सातत्याने लक्ष ठेवावे लागेल. जपानच्या भूमीवर सुरू असलेल्या या आशियाई क्रीडा महाकुंभात भारतीय खेळाडू जी नवी सुवर्णगाथा लिहीत आहेत, ती केवळ आजच्या पदकांच्या तक्त्यातील आकडेवारी वाढवणारी नसून, ती येणाऱ्या अनेक भावी पिढ्यांना क्रीडा जगतात आत्मविश्वासाने आणि निडरपणे उतरण्यासाठी प्रेरणा देणारा एक अमर्याद ऊर्जेचा स्त्रोत ठरत आहे.

## निरूपण

**ज्ञान ते हेचि पाही।**
**येणेवीण जे काही।**
**ते अज्ञान हेही।**
**निश्चिती जाणे।। १७८ ।।**

### ज्ञान ते हेचि पाही:

माऊली अर्जुनाला (आणि जगातील सर्व साधकांना) संबोधित करताना म्हणतात की, यापूर्वी ज्या ज्या गुणांचे वर्णन केले (उदा. अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षमा, सरळपणा, आत्मसंयम इत्यादी) तेच खरे ज्ञान आहे. ज्ञान म्हणजे केवळ पुस्तकी किंवा शाब्दिक माहिती नव्हे, तर अंतःकरणात उतरलेली सद्गुणांची आणि विवेकाची वृत्ती होय.

### येणेवीण जे काही:

ज्या विचारांमध्ये किंवा आचरणात आत्मज्ञानाची, नम्रतेची, भक्तीची आणि विवेकाची जोड नाही; केवळ भौतिक जगात मिरवणारे जे बुद्धिचातुर्य किंवा विद्या आहे, ती सर्व व्यर्थ आहे.

### ते अज्ञान हेही:

माऊली ठामपणे सांगतात की, जे आपल्याला ईश्वरापासून किंवा आत्मरूपापासून दूर नेते, अहंकार वाढवते आणि प्रापंचिक मोहात अडकवते, ते ज्ञान नसून केवळ अज्ञान आहे.

### निश्चिती जाणे:

या बाबतीत मनात कोणतीही शंका अथवा द्विधा मनःस्थिती ठेवू नकोस. विवेक आणि अज्ञानाची ही सीमारेषा अगदी स्पष्ट आणि निश्चित आहे.

### भावार्थ:

माऊली या ओवीतून ज्ञान आणि अज्ञान यांतील स्पष्ट फरक दाखवून देतात. सहसा माणूस पुष्कळ शास्त्रे शिकला, वेद-उपनिषदे पाठांतर केली किंवा पांडित्य मिळवले की स्वतःला ज्ञानी समजू लागतो. परंतु ज्ञानेश्वर महाराज स्पष्ट करतात की, ज्ञानाची खरी कसोटी माणुसकी, नम्रता, अहंकारशून्यता आणि विवेक यात आहे.ज्या विद्येने मानवाचा अहंकार वाढतो, जो दुसऱ्याला तुच्छ समजतो किंवा विषयवासनेत गुंतून राहतो, ते ज्ञान नसून अज्ञानाचाच एक भाग आहे. खरा ज्ञानी तोच, ज्याच्या अंतःकरणात शांती, क्षमाशीलता आणि आत्मज्ञानाचा प्रकाश पसरलेला असतो. म्हणूनच सद्गुणांनी युक्त असलेले जीवन हेच ज्ञान आणि सद्गुणांशिवाय जगणे हे अज्ञान होय, हाच या ओवीचा मुख्य भावार्थ आहे.

## व्यक्तिविशेष



करिना कपूर खान

हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात लोकप्रिय आणि प्रभावशाली अभिनेत्रींपैकी एक म्हणून करिना कपूर खान ओळखली जाते. २५ जून १९८० रोजी मुंबईत जन्मलेली करिना ही प्रसिद्ध कपूर घराण्याची वारसदार आहे. तिचे वडील रणधीर कपूर आणि आई बबिता हे दोघेही अभिनेते होते, तर तिची मोठी बहीण करिश्मा कपूर ही देखील ९० च्या दशकातील आघाडीची अभिनेत्री होती. अशा समृद्ध कलात्मक पार्श्वभूमीत लहानाची मोठी झालेल्या करिनाने अगदी लहानपणापासूनच अभिनयाचे स्वप्न पाहिले होते.वर्ष २००० मध्ये जे. पी. दत्ता यांच्या रिफ्युजी चित्रपटातून करिनाने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. पहिल्याच चित्रपटातील तिच्या अभिनयाचे कौतुक झाले आणि तिला सर्वोत्कृष्ट पदार्पणाचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. यानंतर २००१ मध्ये आलेल्या कभी खुशी कभी गम चित्रपटातील तिची पू ही भूमिका तुफान गाजली. तिची तीच स्टायलिश, बिनधास्त आणि स्वतःच्या प्रेमात असलेली व्यक्तिरेखा आजही पॉप कल्चरचा एक महत्त्वाचा भाग मानली जाते.करिनाने केवळ ग्लॅमरस भूमिकाच केल्या नाहीत, तर अभिनयक्षमतेची चुणूक दाखवणारे आव्हानात्मक चित्रपटही निवडले. २००४ मध्ये आलेल्या चमेली चित्रपटातील तिच्या सेक्स वर्करच्या भूमिकेने समीक्षकांना थक्क केले. या भूमिकेसाठी तिला विशेष ज्युरी पुरस्कार मिळाला. त्यानंतर देव, ओमकारा, जब वी मेट आणि ३ इडियट्स यांसारख्या चित्रपटांतून तिने स्वतःची अष्टपैलू अभिनेत्री म्हणून मोहोर उमटवली. विशेषतः जब वी मेट मधील तिची गीत ही भूमिका भारतीय सिनेमाच्या इतिहासातील सर्वात आवडत्या आणि जिवंत भूमिकांपैकी एक ठरली.करिनाने आपल्या कारकिर्दीत नेहमीच नव्या वाटा चोखाळल्या. चित्रपटसृष्टीत लग्नानंतर किंवा मातृत्वानंतर अभिनेत्रींचे करिअर मंदावते असा एक गैरसमज होता. मात्र, २०१२ मध्ये सैफ अली खानशी विवाह केल्यानंतर आणि दोन मुलांची (तैमूर आणि जहांगीर) आई झाल्यानंतरही करिनाने आपले काम सातत्याने सुरू ठेवले. गुड न्यूज, जाने जान आणि द क्रू यांसारख्या अलीकडील चित्रपटांतून तिने आपण आजही तितकेच बॉक्स ऑफिसवर यशस्वी आहोत हे सिद्ध केले आहे.करिना ही केवळ एक उत्कृष्ट अभिनेत्री नाही, तर ती एक फॅशन आयकॉन आणि लेखिका देखील आहे. तिने आरोग्यावर आणि गरोदरपणातील अनुभवांवर पुस्तकेही लिहिली आहेत. स्वतःच्या अटींवर जगणारी, आत्मविश्वासू आणि अभिनयातील अथांग कौशल्याच्या जोरावर दोन दशकांहून अधिक काळ प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारी करिना कपूर खान ही खऱ्या अर्थाने बॉलिवूडची बेबो आणि एक अनोखे व्यक्तिमत्त्व आहे.

कोकण किनारा हे वृत्तपत्र, मुद्रक प्रकाशक व मालक सौ. तृप्ती श्रीकृष्ण देवरुखकर यांनी सिद्धीविनायक प्रिंटर्स-६३३, कारवांचीवाडी, पोस्ट पोमेंडी बु. ता. जि. रत्नागिरी (महाराष्ट्र) - ४१५६३९ येथून छापून ८२१, स्वरुपानंदन वसाहत खेडशी, रेल्वे स्टेशनजवळ, ता. जि. रत्नागिरी (महाराष्ट्र) ४१५६३९ येथून प्रसिद्ध केले. संपादक - श्री. श्रीकृष्ण तुकाराम देवरुखकर.




# रत्नागिरी रेल्वेस्थानकावर एटीव्हीएम यंत्र दाखल

**रत्नागिरी :** कोकण रेल्वेमार्गावरील अत्यंत महत्त्वाचे व मध्यवर्ती स्थानक मानल्या जाणाऱ्या रत्नागिरी रेल्वेस्थानकावर दररोज हजारो प्रवाशांची ये-जा सुरू असते. विशेषतः सण-उत्सव आणि सुट्ट्यांच्या काळात येथे दरवर्षी प्रवाशांची तुफान गर्दी पाहायला मिळते. अशा वेळी तिकीट खिडकीवर पडणारा अतिरिक्त ताण कमी करण्यासाठी आणि प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे प्रशासनाकडून ‘एटीव्हीएम’ (स्वयंचलित तिकीट विक्री यंत्र) ही अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमुळे आता स्थानकातील प्रवाशांना अवघ्या काही सेकंदांत तिकीट मिळणार असून वेळेची मोठी बचत होणार आहे. परिणामी, नेहमी तिकीट खिडकीवर दिसणाऱ्या तासन्तास लांबच लांब रांगांमधून सर्वसामान्य प्रवाशांची कायमची सुटका झाली आहे.

अनेकदा ऐनवेळी स्थानकात पोहोचणाऱ्या प्रवाशांना खिडकीवरील गर्दीमुळे ट्रेन सुटण्याची मोठी भीती असायची, मात्र डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेल्या या नवीन प्रणालीमुळे तिकीट मिळण्याची प्रक्रिया अत्यंत वेगवान, पारदर्शक आणि सुटसुटीत झाली आहे. या स्वयंचलित मशीनद्वारे प्रवाशांना अनारक्षित तसेच प्लॅटफॉर्म तिकीट अत्यंत सहजतेने मिळवता येणार आहे. तिकिटाचे पैसे देण्यासाठी प्रवाशांना आता रोख रकमेची अजिबात आवश्यकता भासणार नाही; त्याऐवजी स्मार्टकार्ड किंवा यूपीआयद्वारे ऑनलाईन पेमेंट करून तिकीट काढण्याची उत्तम सोय निर्माण करण्यात आली आहे. यामुळे डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन मिळण्यासोबतच प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर आणि जलद होण्यास मदत होईल. या अत्याधुनिक मशीनची कार्यप्रणाली अत्यंत साधी, सुटसुटीत आणि कोणालाही सहज समजेल अशी आहे. प्रवाशांना फक्त स्क्रीनवर आपल्या इच्छित गंतव्य स्थानाची निवड करायची आहे आणि तिकीट जनरेट करायचे आहे. प्रवाशांना आता तिकिटासाठी ताटकळत उभे राहण्याची मुळीच गरज उरलेली नसून, रेल्वे स्थानकावरील गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे होण्यासाठी ही यंत्रणा मोलाची भूमिका बजावणार आहे. सर्व प्रवाशांनी या आधुनिक सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाच्याने केले आहे.

# एसटीच्या चाकाखाली तरुण सापडला; पायावरून चाक गेले

**संगमेश्वर :** साखरपा बसस्थानकात एसटी बस फलाटावर लावत असताना अचानक झालेल्या दुर्घटनेने प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. बसच्या पुढील चाकाचा जोरदार धक्का लागल्याने एका तरुणाच्या पायाला गंभीर दुखापत झाली. ही घटना रविवार २० सप्टेंबर रोजी दुपारी १२.४५ च्या सुमारास घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, कोल्हापूर डेपोची रत्नागिरी-कोल्हापूर एमएच १२ झेड ई ८९५३ क्रमांकाची शिवाई बस साखरपा बसस्थानकातील फलाटावर लावण्यात येत होती. याचवेळी मोर्डे-लाडवाडी येथील संजय रामचंद्र मांडवकर (वय ३८) यांचा तोल गेल्याने ते बसच्या पुढील बाजूला आले. त्यांना बसच्या पुढील चाकाचा जोरदार धक्का लागल्याने त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. घटनेनंतर बसस्थानक परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस फौजदार शांताराम पंदेरे, महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल पावसकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सामाजिक कार्यकर्ते महेंद्र मोरे यांच्या मदतीने जखमी संजय मांडवकर यांना तातडीने साखरपा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. महेश चाचणे ( रा. हुपरी) असे बस चालकाचे नाव आहे.

प्राथमिक उपचारानंतर त्यांच्या पायाला झालेली दुखापत गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना रत्नागिरी येथे हलविण्यात आले. दरम्यान, नेमका अपघात कोणत्या परिस्थितीत घडला, याची शहानिशा साखरपा पोलीस करीत आहेत.

# रोबोकॉल्सवरही आता कारवाई, कंपन्यांना दंडासह ब्लॅकलिस्टचा इशारा

**नवी दिल्ली :** फसवणूक करणारे आणि नकोसे व्यावसायिक फोन कॉल्स रोखण्यासाठी दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (ट्राय) नवे नियम लागू केले आहेत. रोबोकॉल्स आणि ऑटोमेटेड कॉल्सनाही आता नियमनाच्या कक्षेत आणण्यात आले असून, एआयच्या मदतीने अशा कॉल्सची ओळख पटवून संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची दूरध्वनी जोडणी बंद करण्यासोबतच संबंधित कंपनीला वर्षभरासाठी ब्लॅकलिस्ट केले जाऊ शकते.

ट्रायच्या नव्या नियमांनुसार, विनाकारण कॉल करून ग्राहकांना त्रास देणाऱ्या कंपन्यांवर दूरसंचार कंपन्यांकडून कारवाई केली जाणार आहे. स्पॅम कॉल्स करणारे क्रमांक ओळखण्यासाठी यंत्रणा वापरली जाईल. १० दिवसांच्या कालावधीत एकाच व्यक्तीचे किंवा कंपनीचे पाच संशयास्पद क्रमांक आढळल्यास कारवाई केली जाऊ शकते. अशा कंपन्यांची आऊटगोइंग सेवा बंद केली जाईल आणि त्यांना पुन्हा रि-केवायसी करावी लागेल. कंपनीने ग्राहकांना पूर्वसूचना न देता रोबोकॉल केल्यास पाच पैसे प्रतिमिनिट शुल्क आकारले जाणार आहे. तसेच एखाद्या कंपनीकडे ग्राहकाने चौकशी केल्यानंतर त्या कंपनीला संबंधित ग्राहकाला केवळ सात दिवसच कॉल करता येणार आहे. एसएमएसच्या माध्यमातून दिशाभूल करणारे हेडर वापरल्यासही कठोर कारवाई होणार आहे.

# मासेमारी बंदी काळात मच्छीमारांना २० ते २२ हजारांचे अनुदान

**मुंबई :** मासेमारी बंदीच्या कालावधीत मच्छीमारांना आर्थिक आधार देण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून आर्थिक अनुदानाची योजना राबविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. आंध्र प्रदेशच्या धर्तीवर राज्यातील गरजू मच्छीमारांना २० ते २२ हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्याचा सरकारचा विचार असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिली.

एका खासगी वृत्तवाहिनीशी बोलताना नितेश राणे यांनी याबाबत माहिती दिली. आंध्र प्रदेशमध्ये मासेमारी बंदीच्या काळात मच्छीमारांना आर्थिक मदत दिली जाते. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही योजना सुरू करण्याबाबत सरकारकडून नियोजन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

मासेमारी बंदीच्या काळात मासेमारी व्यवसाय ठप्प होत असल्याने अनेक मच्छीमार कुटुंबांसमोर उत्पन्नाचा प्रश्न निर्माण होतो. या कालावधीत मच्छीमारांना आर्थिक आधार मिळावा, यासाठी प्रस्तावित अनुदान योजना महत्त्वाची ठरणार आहे.

राज्यातील पात्र व गरजू मच्छीमारांना २० ते २२ हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्याच्या प्रस्तावावर सरकारकडून पुढील कार्यवाही केली जाणार असल्याचे मंत्री राणे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी शासनाच्या पुढील निर्णयाकडे मच्छीमारांचे लक्ष लागले आहे.

# संगमेश्वरच्या चार एक्सप्रेससाठी ‘उंदीरमामा’ मैदानात!

## बांद्रा-मडगाव, श्री गंगानगर, अजमेर-एर्नाकुलम, जबलपूर-कोयंबतूर एक्सप्रेसना थांबा देण्याची मागणी

**संगमेश्वर :** संगमेश्वर रोड रेल्वे स्थानकावर चार साप्ताहिक एक्सप्रेस गाड्यांना थांबा मिळावा, या मागणीसाठी गणपती बाप्पांचे वाहन असलेल्या ‘उंदीरमामा’च्या माध्यमातून अनोख्या पद्धतीने रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

यावेळी स्टेशन मास्तरांकडे असलेल्या तक्रार वहीत या मागणीची नोंद करण्यात आली. १०११५/१०११६ बांद्रामडगाव एक्सप्रेस, १६३११/१६३१२ श्री गंगानगर एक्सप्रेस, १२९७७/१२९७८ अजमेरएर्नाकुलम एक्सप्रेस आणि ०२१९७/०२१९८ जबलपूरकोयंबतूर एक्सप्रेस या चार साप्ताहिक गाड्यांना संगमेश्वर रोड स्थानकावर थांबा मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

गणेशोत्सवानिमित्त मोठ्या संख्येने चाकरमानी कोकणात दाखल झाले असून,



आता मुंबईसह अन्य शहरांकडे परतीचा प्रवास सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर संगमेश्वर रोड स्थानकावर प्रवाशांची वाढती गरज लक्षात घेऊन विविध महत्त्वाच्या गाड्यांना थांबे मिळावेत, अशी मागणी सातत्याने केली जात आहे.

चारही गाड्यांना संगमेश्वर रोड येथे थांबा मिळाल्यास संगमेश्वर तालुक्यासह परिसरातील प्रवाशांना मुंबई, राजस्थान, उत्तर भारत, केरळ, मध्य प्रदेश आणि दक्षिण भारतातील विविध भागांकडे प्रवासासाठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

रेल्वे प्रशासनाने प्रवाशांची मागणी आणि संगमेश्वर रोड स्थानकावरील प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन या चारही साप्ताहिक एक्सप्रेस गाड्यांना लवकरात लवकर थांबा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. ‘उंदीरमामा’च्या माध्यमातून करण्यात आलेल्या या अनोख्या तक्रारीची रेल्वे स्थानक परिसरात चर्चा रंगली.

## संक्षिप्त

### परतीच्या पावसाने कोकणातील बळीराजा चिंतेत

**संगमेश्वर :** नैऋत्य मोसमी पावसाचा परतीचा प्रवास १९ सप्टेंबरपासून सुरू झाला असून १५ ऑक्टोबरपर्यंत तो संपूर्ण भारतातून माघारी फिरेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. यंदा तालुक्यात दरवर्षीच्या तुलनेत आधीच कमी पाऊस पडला आहे. त्यातच आता भातपीक पसवण्यापूर्वीच (दाणे भरण्यापूर्वीच) मान्सून काढता पाय घेत असल्याने संगमेश्वर तालुक्यातील बहुतांश शेतकरी हवालदिल झाले आहेत. पावसाच्या या अवकाळी परतीमुळे हातातोंडाशी आलेले भाताचे पीक वाया जाण्याची भीती निर्माण झाल्याने बळीराजा कमालीचा चिंतेत सापडला आहे.

### माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत वाशी येथे विशेष आरोग्य शिबिर

**संगमेश्वर :** संगमेश्वर तालुक्यातील वाशी तर्फे देवरूख येथे महाराष्ट्र शासनाच्या माझे गाव आरोग्य संपन्न गाव या अभियानांतर्गत विशेष आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर ग्रामपंचायत वाशी आणि आरोग्य उपकेंद्र, वाशी तर्फे देवरूख यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक आरोग्य उपकेंद्रात पार पडले. या उपक्रमाला स्थानिक नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून, एकूण ६१ ग्रामस्थांनी या शिबिराचा प्रत्यक्ष लाभ घेतला. शिबिरादरम्यान उपस्थितांची हिमोग्लोबिन, रक्तदाब, रक्तातील साखर (मधुमेह) आणि इतर विविध असंसर्गजन्य आजारांची मोफत तपासणी करण्यात आली. याशिवाय ग्रामस्थांची नेत्र तपासणी करून मोतीबिंदू असलेल्या रुग्णांची पुढील उपचारासाठी निवड करण्यात आली, तसेच विविध आवश्यक रक्त तपासण्याही करण्यात आल्या. अशा आरोग्यदायी उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

### एमव्ही रेक एलिट जहाजावरील इजिप्तच्या नागरिकाचा मृत्यू; जयगड सागरी पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद

**रत्नागिरी :** अरबी समुद्रात प्रवास करणाऱ्या एमव्ही रेक एलिट या जहाजावरील इजिप्तच्या एका नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणाची कागदपत्रे मुंबईतील यलोगेट पोलीस ठाण्याकडून रत्नागिरी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर पुढील चौकशीसाठी ती जयगड सागरी पोलीस ठाण्याकडे पाठवण्यात आली आहेत. त्यानुसार जयगड सागरी पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. इस्लाम आदेल अहमद अब्देल लतीफ (वय ३५, सुरक्षा अधिकारी, एमव्ही रेक एलिट, इजिप्त) असे मृत तरुण अधिकाऱ्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एमव्ही रेक एलिट हे जहाज १० एप्रिल २०२६ रोजी दुपारी दीडच्या सुमारास अरबी समुद्रात असताना ही दुर्घटना घडली होती. या घटनेनंतर संबंधित जहाजावरील अधिकाऱ्यांकडून प्राथमिक वैद्यकीय कारवाई करण्यात आली. त्यानंतर वाटद प्राथमिक आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून १६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी पावणेएकच्या सुमारास जहाजावरच आवश्यक ती कारवाई करण्यात आली होती. दरम्यान, हे जहाज जयगड बंदर येथे दाखल झाल्यानंतर १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास या घटनेची अधिकृत नोंद करण्यात आली. मृत व्यक्ती इजिप्तचा नागरिक असल्याचे पोलिसांच्या कागदपत्रांत नमूद आहे. घटनेचे ठिकाण यलोगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत नसल्याने संबंधित आकस्मिक मृत्यूची कागदपत्रे तेथून रत्नागिरी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे वर्ग करण्यात आली होती. पुढील सखोल चौकशीसाठी हे प्रकरण जयगड सागरी पोलीस ठाण्याकडे सोपवण्याचे आदेश मिळाल्यानंतर तिथे आकस्मिक मृत्यूची नोंद करून कायदेशीर तपास सुरू करण्यात आला आहे.

# गणेशोत्सवात सीएनजीचा तीव्र तुटवडा

## इंधनासाठी वाहनांच्या २ ते ३ किलोमीटर लांब रांगा वाहनधारकांना तासनतास ताटकळत

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यात गणेशोत्सवाच्या काळात सीएनजी इंधनाचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून, शहरातील व महामार्गावरील पंपांवर वाहनांच्या २ ते ३ किलोमीटर लांबच लांब रांगा लागल्या आहेत. प्रशासनाच्या शून्य नियोजनामुळे चाकरमानी आणि स्थानिक वाहनधारकांना तासनतास ताटकळत राहावे लागत आहे.



कोकणातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा सण असलेल्या गणेशोत्सवासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही मुंबई, ठाणे आणि पुण्यावरून लाखोंच्या संख्येने चाकरमानी आपल्या खाजगी वाहनांनी रत्नागिरी जिल्ह्यात दाखल झाले आहेत.

सणाच्या काळात वाहनांची संख्या प्रचंड पटीने वाढल्याने शहर आणि ग्रामीण भागातील सीएनजी पंपांवर इंधनाचा अभूतपूर्व तुटवडा निर्माण झाला आहे. ऐन सणासुदीच्या दिवसांतच सीएनजी संपल्याने जिल्ह्यातील वाहनव्यवहार पुरता विस्कळीत झाला असून, नागरिक आणि प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत.

रत्नागिरी शहरातील माळ नाका, एमआयडीसी (जे. के. फाइल्स), हातखंबा आणि नाचणे या प्रमुख ठिकाणच्या पंपांवर दिवस-रात्र वाहनांच्या किलोमीटर लांब रांगा पाहायला मिळत आहेत. हीच परिस्थिती चिपळूण, खेड, लांजा आणि पाली येथील महामार्गालगतच्या सीएनजी पंपांवरही आहे. इंधन भरण्यासाठी चालकांना २ ते ३ किलोमीटरच्या रांगेत उभे राहावे लागत असून, तीन ते चार तासांच्या प्रतीक्षेनंतरही अनेकदा सीएनजी संपल्याचे फलक पाहायला मिळत आहेत. यामुळे गणेशोत्सवासाठी गावी आलेल्या चाकरमान्यांचा बहुमूल्य वेळ रस्त्यावरच वाया जात आहे.

विशेष म्हणजे, गेल्या वर्षीही गणेशोत्सवाच्या काळात जिल्ह्यात अशाच प्रकारचा सीएनजीचा तीव्र तुटवडा जाणवला होता. त्या वेळी चालकांचे प्रचंड हाल झाले होते आणि नागरिकांनी रोष व्यक्त केला होता.

गेल्या वर्षीच्या गंभीर अनुभवातून जिल्हा प्रशासन, आरटीओ आणि सीएनजी पुरवठादार कंपन्यांनी कोणताही धडा घेतलेला नाही. या वर्षी चाकरमान्यांचा ओघ वाढणार हे आधीच स्पष्ट असतानाही सीएनजीचा अतिरिक्त पुरवठा करणे किंवा तात्पुरते टँकर्स उपलब्ध करून देणे, यांसारखी कोणतीही पूर्वतयारी करण्यात आली नाही.

प्रशासनाच्या आणि संबंधित कंपन्यांच्या या नियोजनशून्य कारभारावर वाहनधारक, टॅक्सी-रिक्षा चालक आणि पर्यटकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. सणाच्या आनंदात सीएनजीच्या तुटवड्यामुळे विरजण पडल्याची भावना चाकरमानी व्यक्त करत आहेत. दरवर्षी उद्भवणाऱ्या या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढून सीएनजीचा सुरळीत आणि पुरेशा प्रमाणात पुरवठा करण्यात यावा, अशी जोरदार मागणी आता संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्यातून केली जात आहे.

## वडिलांना मारहाण प्रकरणी मुलांविरुद्ध गुन्हा दाखल

**दापोली :** दारू पिण्याच्या सवयीवरून उद्भवलेल्या घरगुती वादातून जन्मदात्या वडिलांना खोलीत कोंडून त्यांना शिवीगाळ, धक्काबुक्की व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी दाभोळ सागरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी दोन्ही मुलांविरुद्ध अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुरेश संभाजी पालशेतकर (वय ६२, रा. भोपण विठ्ठलवाडी, ता. दापोली) यांनी दाभोळ सागरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीत आपले मुलगे विशाल पालशेतकर आणि नीलेश पालशेतकर यांच्यावर मारहाणीचा थेट आरोप केला आहे. विशेष म्हणजे, संशयित आरोपींपैकी विशाल पालशेतकर हे पोलीस पाटील पदावर कार्यरत असल्याचे पोलीस डायरीत नमूद करण्यात आले आहे.

ही घटना १३ सप्टेंबर रोजी रात्री ११:३० वाजताच्या सुमारास घडली. तक्रारदार सुरेश पालशेतकर आपल्या खोलीत झोपले असताना शेजारून स्पीकरचा मोठा आवाज येत होता. त्यांनी आवाजाची तीव्रता कमी करण्यास सांगितल्याने संशयित मुलांशी त्यांचा वाद झाला. या वादाचे रूपांतर पुढे हिंसक घटनेत झाले. दोन्ही मुलांनी तक्रारदारांच्या खोलीत घुसून त्यांना शिवीगाळ व धक्काबुक्की केली. एवढ्यावरच न थांबता, त्यांनी बाहेरून दरवाजा बंद करून वडिलांना खोलीत डांबले आणि हाताने व लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली.

या मारहाणीत सुरेश पालशेतकर गंभीर जखमी झाले होते. त्यांनी १५ सप्टेंबर रोजी दापोली उपजिल्हा रुग्णालयात जाऊन उपचार घेतले. वैद्यकीय उपचार घेतल्यानंतर त्यांनी दाभोळ सागरी पोलीस ठाणे गाठून दोन्ही मुलांविरुद्ध कायदेशीर तक्रार नोंदवली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## भाट्येत अंमली पदार्थ सेवनकर्ता पकडला

**रत्नागिरी :** भाट्ये येथील मुरकरवाडी स्टॉपजवळ अंधारात असलेल्या एका स्ट्रीट लाईटच्या खांबाखाली बसून एक तरुण संशयास्पदरीत्या अंमली पदार्थांचे सेवन करत होता. त्याच वेळी परिसरात गस्त घालत असलेल्या पोलिसांच्या पथकाला त्याच्या हालचालींवर संशय आला. पोलिसांनी तात्काळ तिथे जाऊन पाहणी केली असता, ३० वर्षीय मर्जान अब्दुल्ला तांडेल (राजीवडा) हा अंमली पदार्थांचे सेवन करताना रंगेहाथ पकडला गेला.

## गांधील माशांच्या हल्ल्यात वृद्धाचा मृत्यू

**खेड :** तालुक्यातील पोयनार येथील रहिवासी असलेले ६२ वर्षीय पांडुरंग गणपत डिगे हे आपल्या दैनंदिन कामासाठी गोठणी नदीवर गेले होते. त्यावेळी तिथे अचानक गांधील माशांच्या झुंडीने त्यांच्यावर भीषण हल्ला चढवला. गांधील माशांनी तीव्र चावा घेतल्यामुळे त्यांची प्रकृती चिंताजनक बनली. त्यांना तातडीने उपचारासाठी कळंबणी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तिथे तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले.

## गणेशभक्तांच्या परतीच्या प्रवासासाठी एसटी महामंडळाची लालपरी सज्ज

**साखरपा :** कोकणात बाप्पाच्या उत्सवासाठी मोठ्या संख्येने दाखल झालेल्या चाकरमान्यांच्या आणि गणेशभक्तांच्या परतीच्या प्रवासासाठी एसटी महामंडळाची लालपरी पूर्णपणे सज्ज झाली आहे. गणेशोत्सवासाठी चाकरमान्यांचे आगमन झाल्याने गावाच्या गावे हाउसफुल झाली होती; मात्र आता उत्सव संपल्यानंतर सर्वांना परतीचे वेध लागले आहेत.

गणेशभक्तांना सुरक्षितपणे गावी आणणाऱ्या लालपरीने, आता त्यांना पुन्हा मुंबईसह इतर शहरांत सुखरूप पोहोचवण्यासाठी



कंबर कसली आहे, असेच चित्र साखरपा बसस्थानकात पाहायला मिळत आहे. यंदा गणेशोत्सवादरम्यान पावसाने विश्रांती घेतल्यामुळे सर्व भक्तांनी अत्यंत उत्साहात आणि आनंदाने उत्सव साजरा केला. आता चाकरमान्यांचा परतीचा प्रवास सुकर व आरामदायी व्हावा यासाठी एसटी प्रशासनाने योग्य नियोजन केले आहे.

## रत्नागिरीत ब्राऊन हेरॉईनसह नेपाळी अटकेत

**रत्नागिरी :** शहरातील आठवडा बाजाराच्या मागील बाजूस अंमली पदार्थांची खरेदी-विक्री होत असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने तिथे छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी १ लाख २१ हजार रुपये किमतीचे ७ ग्रॅम ब्राऊन हेरॉईन आणि २४२ पुड्या जप्त केल्या. यासोबतच एक मोबाईल असा एकूण १ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी सध्या रत्नागिरीत राहणारे नेपाळी नागरिक शिव कुमार चौधरी व दुर्गा जीत बहादुर या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

# बेपत्ता नोंदीऐवजी आता थेट अपहरणाचा गुन्हा

**रत्नागिरी :** एखादी व्यक्ती घरातून निघून गेल्यास किंवा बेपत्ता झाल्यास पोलीस ठाण्यात केवळ मिसिंग (बेपत्ता) अशी नोंद करून नातेवाइकांना शोधासाठी थांबवण्याची जुनी पद्धत आता पूर्णपणे बंद होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्याचा निकाल देताना बेपत्ता व्यक्तींच्या शोधासाठी नवीन व कडक मार्गदर्शक तत्त्वे लागू केली आहेत. या आदेशाची राज्यात कठोर अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट निर्देश गृह खात्याने पोलीस प्रशासनाला दिले आहेत. त्यामुळे आता कोणतीही व्यक्ती बेपत्ता झाल्यास पोलीस ठाण्यात थेट अपहरणाचा गुन्हा दाखल करून पोलिसांना तात्काळ तपासाची चक्रे फिरवावी लागणार आहेत.

नवी मार्गदर्शक तत्त्वे लागू झाल्यामुळे बेपत्ता व्यक्तींची पोलिसांमधील मिसिंग म्हणून नोंद करण्याची प्रक्रिया बंद झाली आहे. कोणत्याही वयाच्या व्यक्तीची बेपत्ता झाल्याची तक्रार प्राप्त होताच पोलिसांना




भादंवि/भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार थेट अपहरणाचा गुन्हा नोंदवून घेणे आता बंधनकारक करण्यात आले आहे.

गुन्हा दाखल होताच पोलिसांना तात्काळ शोधमोहीम सुरू करावी लागणार आहे. त्यासाठी संशयित ठिकाणे, सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि तांत्रिक विश्लेषणाचा वापर करून बेपत्ता व्यक्तीचा वेगाने शोध घ्यावा लागेल. या तपासात अथवा कारवाईत टाळाटाळ आणि दिरंगाई दाखवल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यावरच कारवाई करण्याचे कडक निर्देशही देण्यात आले आहेत.

दरम्यान, एखाद्या प्रकरणात अपहरणाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधित बेपत्ता व्यक्ती जर २४ तासांच्या आत सुखरूप परतली किंवा सापडली, तर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून दाखल केलेला गुन्हा तत्काळ निर्गत (बंद) केला जाईल, अशीही तरतूद यामध्ये करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या नवीन नियमांमुळे बेपत्ता व्यक्तींचा शोध अधिक जलद आणि प्रभावीपणे घेणे शक्य होणार असून पोलिसांच्या दुर्लक्ष करण्याच्या वृत्तीला मोठा चाप बसणार आहे.

## नादुरुस्त रस्त्यामुळे ग्रामस्थांवर दोन किलोमीटर पायपीटीची वेळ

**खेड :** पक्का रस्ता उपलब्ध असूनही वाहनांची ये-जा बंद झाल्याने किंजळे तर्फे नातू ते कळकरायवाडी आणि मांडवे-कोसमवाडी परिसरातील ग्रामस्थांना तब्बल दोन किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील हा रस्ता प्रशासकीय दुर्लक्षामुळे अक्षरशः मृतवत झाला आहे. केवळ तात्पुरती डागडुजी केली जात असून कोणतीही ठोस उपाययोजना होत नसल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

किंजळे तर्फे नातू फाटा ते कळकरायवाडी हा सुमारे ६ किलोमीटरचा मार्ग आहे. जुलै महिन्यात ५, ६ व ७ तारखेला झालेल्या अतिवृष्टीमुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणावर दरडी कोसळून रस्ता सलग तीन दिवस पूर्णपणे बंद झाला होता. त्यानंतर बांधकाम विभागाने तात्पुरती मलमपट्टी केली; मात्र सध्या अवजड वाहने, एसटी बस आणि रुग्णवाहिकेलाही या मार्गावरून जाणे सुरक्षित राहिलेले नाही. त्यामुळे चालकांना वाहने अर्ध्या रस्त्यातच उभी करावी लागत असून, उर्वरित दोन किमीचा प्रवास ग्रामस्थांना चालतच करावा लागत आहे.

हा घाट परिसरातील मार्ग असल्याने याला औपचारिकपणे घाटरस्ता घोषित करून संरक्षक भिंती, गटारे आणि आवश्यक ठिकाणी उपाययोजना करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. याबाबत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडेही पत्रव्यवहार करण्यात आला आहे. २७ फेब्रुवारी २०२६ च्या पत्रानुसार लेखाशीर्ष ५०५४-०३-०४ मध्ये या रस्त्याचा समावेश झाला असला, तरी यंदाच्या अर्थसंकल्पात प्रत्यक्ष निधी मंजूर झाला नसल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

## मासेमारी बंदीकाळात मच्छिमारांना अनुदानाची घोषणा

### आंध्र प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रात अंमलबजावणी; २० ते २२ हजारांची आर्थिक मदत

**कणकवली :** दरवर्षी मान्सूनच्या काळात आणि माशांच्या प्रजननाच्या टप्प्यात समुद्रातील मासेमारीवर शासनाकडून बंदी घातली जाते. या मासेमारी बंदीच्या काळात किनारपट्टीवरील हजारो मच्छिमार बांधवांचे रोजगार ठप्प होतात आणि त्यांना अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीचा सामना करावा लागतो. अशा कठीण प्रसंगी राज्यातील गरजू मच्छिमारांना आर्थिक स्थैर्य आणि मोठा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

मासेमारी बंदीच्या कालावधीत मच्छिमारांना थेट २० ते २२ हजार रुपयांचे आर्थिक अनुदान देण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिली आहे.

मंत्री नितेश राणे यांनी शुक्रवारी जाहीर केले की, आंध्र प्रदेश सरकार ज्याप्रमाणे मासेमारी बंदीच्या काळात त्यांच्या राज्यातील गरजू व विशिष्ट मच्छिमार समाजाला प्रत्येक कुटुंबामागे




२० हजार रुपयांची आर्थिक मदत पुरवते, त्याच धर्तीवर आता महाराष्ट्र सरकार देखील ही कल्याणकारी योजना लागू करणार आहे. आंध्र प्रदेशातील या योजनेचा सखोल अभ्यास करून महाराष्ट्रात तिची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल, जेणेकरून राज्यातील मच्छिमार कुटुंबांना आर्थिक अडचणींवर मात करणे शक्य होईल.

कोकण किनारपट्टीसह संपूर्ण राज्यातील हजारो मच्छिमार कुटुंबे केवळ समुद्रातील मासेमारीवरच आपल्या उपजीविकेसाठी अवलंबून असतात. वर्षातील काही महिने मासेमारी बंद असल्याने मच्छिमारांच्या हातात कोणताही कमाईचा स्रोत अथवा रोजगाराचे साधन उरत नाही. मासेमारीचा नवा हंगाम कधी सुरू होईल, याची प्रतीक्षा करत त्यांना घरातच शांत बसावे लागते. अशा संकटाच्या काळात थेट बँक खात्यात आर्थिक अनुदान जमा झाल्यास मच्छिमारांना कौटुंबिक गरजा भागवणे सोपे जाणार आहे.

मच्छिमारांच्या रोजगाराचा प्रदीर्घ काळ प्रलंबित असलेला प्रश्न सोडवण्यासाठी आणि त्यांच्या आयुष्यात आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी मत्स्यव्यवसाय व बंदरे विभागाने हे महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. शासनाच्या या सकारात्मक धोरणामुळे हलाखीच्या परिस्थितीत जगणाऱ्या हजारो मच्छिमार कुटुंबांना खूप मोठा दिलासा मिळणार असून, ही योजना लवकरच राज्यभरात अंमलात आणली जाणार आहे.

## राजापूर तालुक्यात बंद घर फोडले

**राजापूर :** तालुक्यातील खरवते वाणीवाडी येथील सानिका संतोष गोरे या गौरी-गणपती उत्सवासाठी आपल्या माहेरी गेलेल्या होत्या. हीच संधी साधून अज्ञात चोराने त्यांच्या बंद घराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने कपाटातील सुमारे ३७ हजार ४६८ रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने आणि ३० हजार रुपयांची रोकड असा एकूण ६७ हजार ४६८ रुपयांचा ऐवज लांबवला. ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी सानिका गोरे यांच्या तक्रारीवरून राजापूर पोलीस ठाण्यात अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## चिपळूण आगाराचा निर्णय: गणेशोत्सवासाठी एसटी बससेवेच्या मार्गात तात्पुरता बदल

**चिपळूण :** गौरी-गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेता, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चिपळूण आगाराने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी १९ ते २२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत चिपळूण आगारातून सुटणाऱ्या काही नियमित तसेच जादा बससेवेच्या मार्गात तात्पुरत्या स्वरूपात फेरबदल करण्यात आले आहेत.

एसटी महामंडळाने दिलेल्या माहितीनुसार, या चार दिवसांच्या कालावधीत मुंबई, बोरीवली, ठाणे, कल्याण, भांडुप, डोंबिवली, नालासोपारा, चिंचवड, स्वारगेट, बदलापूर आणि पनवेल या महत्त्वाच्या मार्गांवर जाणाऱ्या सर्व नियमित आणि अतिरिक्त बसेस चिपळूण मुख्य आगाराऐवजी शिवाजीनगर बसस्थानकावरून सोडण्यात येणार आहेत.

गौरी-गणपती सणानिमित्त चाकरमानी आणि प्रवाशांची होणारी वाढती गर्दी सुरळीतपणे हाताळता यावी, यासाठी हा तात्पुरता बदल करण्यात आला आहे. या मार्गांवर प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांनी वेळेची बचत आणि गैरसोय टाळण्यासाठी शिवाजीनगर बसस्थानकावरूनच बसेस पकडाव्यात, असे आवाहन चिपळूण एसटी प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## गावाच्या विकासासाठी पूर्ण सहकार्य राहिल: सभापती सूर्यकांत खेतले

### अडरे ग्रामसेवा मंडळातर्फे विद्यार्थी व गुणवंतांचा सत्कार

**अडरे :** चिपळूण तालुक्यातील अडरे ग्रामसेवा मंडळ गावाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करत असून, ही कौतुकास्पद बाब आहे. या गावाच्या विकासासाठी पंचायत समिती व शासन स्तरावरून सदैव सहकार्य राहिल, असे प्रतिपादन चिपळूण पंचायत समितीचे सभापती सूर्यकांत खेतले यांनी केले.

अडरे ग्रामसेवा मंडळ, मुंबई यांच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त मंडळाचे अध्यक्ष कृष्णकांत कदम यांच्या निवासस्थानी गुणवंत विद्यार्थ्यांचा व विविध क्षेत्रांत यश मिळवलेल्या मान्यवरांचा सत्कार सोहळा पार पडला. याप्रसंगी इयत्ता १० वीतील गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कम व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले, तसेच पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक आणि अंगणवाडीतील मुलांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

ठाणे महापालिकेतून सेवानिवृत्त झालेले संदीप कदम, सार्वजनिक बांधकाम विभागातून निवृत्त झालेले अभियंता प्रमोद कदम, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक अनंत कदम, कल्याण-डोंबिवली महापालिकेतून निवृत्त झालेले प्रदीप कदम, वरदायिनी पतसंस्थेचे नवनिर्वाचित संचालक संजय सुर्वे, तसेच बंड्यामामा उर्फ बाबाजी कदम यांचा जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास मंडळाचे अध्यक्ष कृष्णकांत कदम, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक दत्ताराम निर्मळ, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष रवींद्र कदम, माजी सरपंच संदेश पवार आणि इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पराग कदम यांनी केले.